MHND150001312022

संं.फौ.ख.क्र.३७/२०२२

सतिश वि. मारोती

## <u>नि.क्र.१८ वरील आदेश</u>

०१. फिर्यादीने फिर्यादपत्रामध्ये दुरुस्ती करण्याबाबत परवानगी मिळण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दिला आहे.

०२. फिर्यादी यांचे असे कथन केले की, त्याने सदरचे प्रकरण हे आरोपी विरुध्द परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ नुसार दाखल केले आहे. आरोपीला पैश्याची आवश्यकता असल्यामुळे रुपये ४,००,०००/– हे दिनांक २४/१०/२०२१ रोजी पंचासमक्ष मागणी केली व त्याच दिवशी दिनांक २४/१०/२०२१ रोजी पंचासमक्ष पैसे दिले आहेत. परंतु फिर्याद मधील परिच्छेद क्र.२ मधील ओळ क्र.२ व ओळ क्र.४ मध्ये दिनांक २४/१०/२०२१ ऐवजी दिनांक २४/११/२०२१ व परिच्छेद क्र.३ मध्ये ओळ क्र.६ मध्ये धनादेश अनादरित होऊन परत मिळल्याचा दिनांक २८/१२/२०२१ ऐवजी दिनांक २८/११/२०२१ अशी टाईपीस्टच्या चुकीमुळे चुक झाली आहे. त्यामुळे वरील दुरुस्ती करण्याची परवानगी देण्यात यावी अशी विनंती केली आहे.

०३. आरोपीने प्रस्तुतच्या अर्जास हरकत घेतली की,प्रस्तुत प्रकरण दिनांक ०४/०२/२०२२ रोजी नोंदणीकृत करण्यात आले व दिनांक २७/०१/२०२३ रोजी न्यायालयाने इश्यु प्रोसेसचा आदेश पारित केला आहे. त्यानंतर प्रकरण हे २ वर्षापासुन प्रलंबित आहे. सदर बाब फिर्यादीस चुकीची दुरुस्ती करणेकामी प्रकरणात साक्षीचे शपथपत्र दिल्यानंतर दुरुस्ती अर्ज दिला आहे. प्रकरण हे फौजदारी स्वरुपाचे असुन प्रकरणात दुरुस्तीसाठी कोणतीही तरतुद नाही. त्यामुळे फिर्यादीचा दुरुस्ती अर्ज फेटाळण्यात यावा अशी विनंती केली.

०४. फिर्यादी व आरोपी यांचे कथने विचारात घेता खालील मुद्दे माझे समोर उपस्थित होतात. मी सदर मुद्दयावरील माझे निष्कर्ष कारणमिमांसेसह खालीलप्रमाणे नोंदविले आहे.

| **अ.क्र.** | **मुद्दे** | **निष्कर्ष** |
|---|---|---|
| ०१. | फिर्यादीचा अर्ज मंजुर होण्यास पात्र आहे काय? | **..होकारार्थी..** |
| ०२. | काय आदेश? | **अंतीम आदेशाप्रमाणे** |

०५. फिर्यादी तर्फे विधीज्ञ श्री. एस.यु.जगदंबे यांचा युक्तिवाद ऐकला आरोपी

तर्फे विधीज्ञ श्री. यु.बी.बिलोलीकर यांचा युक्तिवाद ऐकला. अभिलेख पडताळला.

## :: <u>कारणमिमांसा</u> ::

**<u>मुद्दा क्र.०१ करीता.</u>**

०६. फिर्यादीने सदरची फिर्याद परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ नुसार दाखल केली आहे. फिर्यादीने फिर्यादपत्रात नमुद केले आहे की, दिनांक २४/११/२०२१ रोजी आरोपीने उसणे पैसे मागितले. त्यामुळे त्याने त्याच दिवशी पंचासमक्ष ४,००,०००/– रुपये दिले व सदरचे पैसे हे एक महिण्यानंतर परत करण्याच्या अटीवर दिले होते. त्यावेळी आरोपीने पैश्याची हमी म्हणुन दिनांक २४/११/२०२१ रोजी आय.सी.आय.सी. बँक शाखा नांदेडचा चेक क्र.०००३४९ रक्कम रुपये ४,००,०००/– साक्षीदारासमक्ष दिला. परंतु, सदरचा चेक वटला नाही. अनादरीत झाला. आरोपीला नोटीस दिली परंतु, त्याने मुदतीमध्ये धनादेशावरील रक्कम फिर्यादीला आणुन दिलेली नाही म्हणुन त्याने आरोपी विरुध्द प्रस्तुतची फिर्याद दाखल केली आहे.

०७. फिर्यादीचे या अर्जात असे कथन आहे की, त्याने आरोपीला दिनांक २४/११/२०२१ रोजी पैसे दिलेले नसुन दिनांक २४/१०/२०२१ रोजी रक्कम रुपये ४,००,०००/– दिले आहेत.

०८. फिर्यादीच्या वर नमुद कथनावरुन असे दिसुन येते की, फिर्यादीने आरोपीला पंचासमक्ष पैसे दिले होते व ती रक्कम १ महिण्याने परतफेड करण्याचे ठरले होते व त्या रकमेच्या परतफेडीकरीता आरोपीने वादातील धनादेश फिर्यादीला दिला आहे, असे सकृतदर्शनी दिसुन येते. तसेच फिर्यादपत्रातील नमुद केलेला धनादेश हा आरोपीने फिर्यादीला दिनांक २४/११/२०२१ रोजी दिलेला आहे व तो धनादेश दिनांक २८/१२/२०२१ रोजी अनादरीत होवून फिर्यादीला परत मिळाला आहे. म्हणजेच फिर्यादीने आरोपीला पैसे दिले त्या तारखेनंतर आरोपीने फिर्यादीला वादातील धनादेश दिल्याचे स्पष्ट होते, त्यामुळे वादातील धनादेश फिर्यादीला दिल्याची तारीख दिनांक २४/११/२०२१ अशी आहे. त्यामुळे त्या तारखेच्या एक महिना अगोदर फिर्यादीने आरोपीला रक्कम दिली असावी, असे स्पष्ट होते. त्यामुळे तशी तारीख फिर्यादपत्रामध्ये नमुद करणे आवश्यक होते. परंतु, दिनांक २४/११/२०२१ रोजीच्या एक महिना अगोदरची तारीख फिर्यादीमध्ये नमुद नाही. परिणामी फिर्यादीने आरोपीला

पैसे दिल्याची तारीख ही दिनांक २४/११/२०२१ अशी नजरचुकीने व टंकलेखनातील त्रृटीमुळे नमुद झाल्याचे दिसुन येते. याशिवाय वादातील धनादेश हा दिनांक २८/११/२०२१ रोजी अनादरित होऊन परत मिळाला आहे, असे फिर्यादपत्रामध्ये नमुद आहे. परंतु, फिर्यादीने महाराष्ट्र ग्रामीण बँक, शाखा धर्माबादचा बँक मेमो अभिलेखावर दाखल केला आहे. त्याचे अवलोकन केले असता धनादेश अनादरित होऊन परत आला याची तारीख दिनांक २८/१२/२०२१ अशी त्यामध्ये नमुद आहे. बॅकेने दिलेल्या मेमोला बॅर्कींग कायदयातील तरतुदीनुसार गृहीतक आहे व त्या मेमो मधील मजकुर हा खरा व बरोबर असल्याचे ग्राहय धरने कायदयाने आवश्यक आहे. सदर मेमो मधील मजकुर खरा व बरोबर असल्यामुळे त्या मेमोमध्ये धनादेश अनादरित झाल्याची तारीख ही दिनांक २८/१२/२०२१ असल्यामुळे त्याच तारखेला धनादेश अनादरित झाल्याचे सकृतदर्शनी सिद्ध होते. परंतु, फिर्यादीने धनादेश अनादरित झाल्याची मेमो मधील तारीख फिर्यादपत्रामध्ये नमुद न करता वेगळीच तारीख दिनांक २८/११/२०२१ नमुद केलेली आहे, जी चुकीची आहे.

०९. त्यामुळे फिर्यादी अर्जात मागणी करतो त्याप्रमाणे दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य व कायदेशीर होणारे आहे. परिणामी प्रस्तुतचा अर्ज मंजूर केल्यास फिर्यादीचे किंवा आरोपीचे कोणतेही नुकसान होणारे नाही उलट सदर दुरुस्तीमुळे योग्य ती हकीकत अभिलेखावर येण्यास मदत होणार आहे. तसेच, त्याबाबत फिर्यादीला व आरोपीला पुरावा देण्याची संधी मिळणार आहे, ज्यामुळे खटल्याचा गुणवत्तेवर निर्णय करणे सोयीचे होणार आहे परंतु, प्रस्तुतचा अर्ज नामंजूर केल्यास फिर्यादीचे फार मोठे नुकसान होणार आहे, म्हणून सदरची चूक दुरुस्ती करण्यास परवानगी देणे योग्य व कायदेशीर ठरणारे आहे. तसेच मी माझी भिस्त मा.राज्यस्थान उच्च न्यायालयाच्या पुढील न्यायनिर्णयावरती ठेवतो. *Hawasingh Vs. Madan Lal decided on 17/08/2023* मा. राज्यस्थान उच्च न्यायालयाने असे निरिक्षण नोंदवले आहे की, परक्राम्य संलेख अधिनियम, १८८१ चे कलम १३८ प्रमाणे दाखल केलेल्या प्रकरणामध्ये टंकलेखनातील चुकीमुळे अथवा तांत्रीक दोषामुळे फिर्यादीमध्ये चुकीचा धनादेश क्रमांक नमुद झाल्यास तसेच धनादेश दिल्याबाबतची तारीख तांत्रीक चुकीमुळे चुकीची नमुद झाली असल्यास तश्या चुका दुरुस्त करता येतात.

१०. वर नमुद मा. राज्यस्थान उच्च न्यायालयाचा न्यायनिवाडा व त्यातील निर्णय मुलाधार हा प्रस्तुत प्रकरणात फिर्यादीला उपयोगी पडणारा आहे. त्या

प्रकरणातील हकीकत व फिर्यादीने दाखल केलेल्या प्रकरणातील हकीकत सारखीच आहे. त्यामुळे वर नमुद न्यायनिवाडा व मी दिलेली कारणमिमांसा यावरुन फिर्यादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे, म्हणून मी **मुद्दा क्र.०१ चे उत्तर होकारार्थी** नोंदवीत आहे.

**मुद्दा क्र.०२ करीताः**

१०. मुद्दा क्र.०१ च्या विवेचनावरून फिर्यादीचा अर्ज मंजूर होण्यास पात्र आहे. म्हणून मुद्दा क्र.०२ च्या उत्तरादाखल मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

**:: आदेश ::**

०१) निशाणी क्र.१८ वरील अर्ज मंजूर करण्यात येते.

०२) फिर्यादीने अर्जात मागणी केल्या प्रमाणे मुळ फिर्यादीमध्ये आवश्यक ती दुरुस्ती १४ दिवसाचे आत करावी. तसेच दुरुस्ती प्रत व त्या संदर्भाने नवीन प्रतिज्ञापत्र दाखल करावे.

SANJAY MARUTI KOLEKAR
Digitally signed by SANJAY MARUTI KOLEKAR
Date: 2025.06.20 17:56:27 +0530

(एस. एम. कोळेकर)
न्यायदंडाधिकारी प्रथम वर्ग,
धर्माबाद, जि. नांदेड

दिनांकः २०/०६/२०२५

# CERTIFICATE

I affirm that the contents of this P.D.F. File judgment/order are same, word to word, as per the original judgment/order.

Name of the Stenographer - K.d.Pawar

Name of Court -Judicial Magistrate First Class, Dharmbad.

Date of Dictation -20/06/2025.

Judgment signed by the P.O. on-20/06/2025.

Judgment uploaded on -20/06/2025.